महाराष्ट्र शासन

जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता, मार्गदर्शन केंद्र,
नविन प्रशासकीय इमारत क्र. २, दुसरा माळा (विंग-ए),
सिव्हील लाईन्स, नागपूर-४४०००१

Website : www.mahaswayam.gov.in E-Mail : asstdiremp.nagpur@ese.maharashtra.gov.in

जा.क्र./जिकौविरोवउमाके.नाग/कौवि/कक्ष-३/तुकडी वाटप/२०२०-२१/ ६० /२०२१ Ph. : 0712-2531213

दिनांक :- ०५ फेब्रुवारी, २०२१

गोपनीय कार्यादेश

प्रति,

केंद्र प्रमुख

F6 TRAINING SOLUTION Bhagini Nivedita Shiksha Samiti
JORAS HOUSING SOCIETY KATOL ROAD NEAR GO GAS MAGPUR 4440013
VTP ID 505VTP114844

विषय :- किमान कौशल्य विकास कार्यक्रम बॅचेसचे वाटप वर्ष २०२०-२१

संदर्भ :- १. प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियानांतर्गत "किमान कौशल्य विकास कार्यक्रम" या जिल्हास्तरीय सर्वसाधारण योजनेस प्रशासकीय मान्यता देणेबाबत शासन निर्णय क्रमांक कौविउ-२०१५/अभियान-१ दि. १६ मार्च, २०१७

२. कौशल्य विकास व उद्योजकता विभाग शासन निर्णय क्रमांक कौविउ-२०१५/ प्र.क्र.१२२/अभियान-१ दि. २१ जानेवारी, २०२०

३. कौशल्य विकास व उद्योजकता विभाग यांचे शासन निर्णय क्र. कौविउ-२०१९/ प्र.क्र./९६/अभियान-१ दि. २७ मे, २०२०

४. कौशल्य विकास व उद्योजकता आयुक्तालय, नवी मुंबई यांचे पत्र क्र.कौविरोवउआ-९/ किकौविका-सु.कार्यपद्धती/३५११-१६/२०२० दि. ०९ जुलै, २०२०

५. जिल्हा कौशल्य विकास कार्यकारी समितीची बैठक दि. १० जुलै, २०२०

६. किमान कौशल्य विकास या जिल्हास्तरीय योजना आर्थिक वर्ष २०२०-२१ करिता निवड केलेल्या अभ्यासक्रमासाठी तांत्रिक मान्यता प्रदान करण्याबाबतची बैठक दि. २१ जुलै, २०२०

७. किमान कौशल्य विकास कार्यक्रम जिल्हास्तरीय योजना आर्थिक वर्ष २०२०-२१ करिता निवड केलेल्या अभ्यासक्रमासाठी प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याबाबत तसेच निधी उपलब्ध करुन देण्याबाबतची बैठक दि. ०६ ऑगस्ट, २०२०

८. महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी, मुंबई यांचे परिपत्रक क्र. MSSDS/ २०२०/७८३ दि. ३०/१०/२०२०

उपरोक्त संदर्भीय विषयाचे अनुषंगाने आपणास सुचित करण्यात येते की, प्रमोद महाजन कौशल्य विकास व उद्योजकता अभियानाअंतर्गत किमान कौशल्य विकास कार्यक्रम जिल्हास्तरीय सर्वसाधारण योजना सन २०२०-२१ खालील तक्त्यांत प्रशिक्षण मॉड्युल्स करिता आपल्या केंद्राची निवड करण्यात आलेली आहे.

| अ. क्र. | योजनेचे नांव | प्रशिक्षणाचे क्षेत्र | कोर्सचे नांव | कोर्स कोड | प्रशिक्षण कालावधी (तास) | प्रशिक्षण दर (प्रति तास प्रति प्रशिक्षणार्थी) | उमेदवारांची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | किमान कौ. वि. कार्यक्रम जिल्हास्तरीय सर्वसाधारण योजना सन २०२०-२१ | Information & Communication Technology | BPO-NON VOICE | ICT705 | 500 | 40 | 20 |

AC
DSDE & EGC
NGP

Scanned with CamScanner

<u>सदर योजना अंमलबजावणी करण्याची अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहे :-</u>

१. सदर योजनेची कार्यकक्षा नागपूर जिल्ह्यापुर्ती मर्यादित असुन जिल्हा कार्यक्षेत्रातील १५ ते ४५ वयोगटातील लाभार्थी उमेदवारांची निवड करणे बंधनकारक राहील.

२. कार्यादेश प्राप्त झाल्यानंतर तातडीने पात्र उमेदवारांची तुकडी वेबपोर्टलवर अपलोड करणे बंधनकारक राहील, परंतु संबंधित केंद्रानी कार्यादेश घेतल्यानंतर जाणीवपूर्वक बॅच अपलोड न करता प्रशिक्षण सुरु करण्यासाठी विलंब केल्यास अशा केंद्राना किमान कौशल्य विकास कार्यक्रम अंतर्गत किंवा इतर कोणत्याही कौशल्य विकास कार्यक्रमांतर्गत भविष्यात तुकडी देण्यात येणार नाही, त्यामुळे संपुर्ण प्रक्रिया जलदगतीने पूर्ण करणे केंद्र प्रमुखांवर बंधनकारक आहे, कोणत्याही परिस्थितीमध्ये प्रशिक्षणार्थी उमेदवारांचे प्रशिक्षण मध्यावधीमध्ये (Midterm) बंद करता येणार नाही, (बॅच अपलोड करणे, TBN प्राप्त करुन घेणे, उमेदवारांचे मुल्यमापन/असेसमेंट पूर्ण करणे आणि अंतिमत: उमेदवारांना रोजगार/स्वयंरोजगार उपलब्ध करुन देऊन त्याची माहिती वेबपोर्टलला अपलोड करणे संपूर्ण प्रक्रिया पार पाडणे इ.) ह्या सर्व बावी प्रशिक्षण केंद्रानी वेळतच पुर्ण करणे आवश्यक आहे, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी, मुंबई यांचेकडून तुकडीस मान्यता प्राप्त झाल्यानंतर (TBN) प्रत्यक्षात प्रशिक्षण सुरु झालेले आहे असे समजण्यात येईल, (TBN) मिळण्यास सोसायटी कडून विलंब झाल्यास त्याची जबाबदारी या कार्यालयाची राहणार नाही.

३. शासन निर्णय संदर्भ क्र. १, २ व ३ तसेच महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी, मुंबई यांनी वेळोवेळी निर्गमित केलेले परिपत्रके, मार्गदर्शक सुचना यांचे पालन करणे बंधनकारक राहील.

४. उमेदवारांना दर्जेदार व गुणवत्ताधिष्ठित प्रशिक्षण देणे बंधनकारक राहील, प्रशिक्षणादरम्यान जिल्हा कौशल्य विकास कार्यकारी समितीच्या वतीने मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा कौशल्य विकास कार्यकारी समिती स्वत: किंवा त्यांचे प्रतिनिधी, सहायक आयुक्त तथा सदस्य सचिव, जिल्हा कौशल्य विकास कार्यकारी समिती, नागपूर स्वत: किंवा त्यांचे प्रतिनिधी प्रशिक्षण वर्गांना भेटी देऊन प्रशिक्षणाची गुणवत्ता तपासण्यात येईल, प्रशिक्षणादरम्यान कोणत्याही प्रकारची अनियमितता किंवा गैरप्रकार आढळल्यास केंद्राविरुद्ध कार्यवाही करुन आर्थिक देयके गोठविण्यात येतील.

५. उपस्थित उमेदवारांची हजेरी बॉयोमॅट्रीक/कोरोना प्रादुर्भावामुळे विकसित करण्यात आलेले Duty Par प्रणालीवर घेणे बंधनकारक राहील.

६. प्रशिक्षण पुर्ण केलेल्या उमेदवारांचे मुल्यमापन, असेसमेंट पुर्ण करुन त्यांना कौशल्य प्रशिक्षण प्रमाणपत्र विहित कालावधीत देणे केंद्रप्रमुखांवर बंधनकारक राहील, कोणत्याही उमेदवारांने त्याबाबत तक्रार केल्यास संबंधित केंद्राविरुद्ध कार्यवाही करण्यात येईल, प्रशिक्षणार्थी उमेदवारांकडून कोणत्याही प्रकारचे प्रशिक्षण शुल्क आकारणयात येणार नाही, सदर प्रशिक्षण पुर्णत: विनामुल्य स्वरुपात उमेदवारांना देणे आवश्यक आहे.

७. ९०% पेक्षा अधिक उपस्थिती टिकविणे बंधनकारक राहील, जास्तीत जास्त उमेदवार असेंसमेंट प्रक्रियेसाठी पात्र ठरुन त्यांना प्रमाणपत्र हस्तातरीत करणे तदनंतर रोजगार/स्वयंरोजगार उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे, तसेच सर्व माहिती वेळोवेळी पोर्टलवर अपलोड करणे हे देखील आवश्यक आहे.

८. संदर्भ क्र. ८ अन्वये प्रशिक्षणार्थ्यांचे कौशल्य विकास प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर ०१ वर्षाच्या कालावधीनंतर संबंधित केंद्रामार्फत प्लेसमेंट टप्प्याचे देयके सादर केले असल्यास अशा देयकांची अदायगी या कार्यालयामार्फत करण्यात येणार नाही, त्यामुळे Placement देण्याचे कामकाज देखील शासन निर्णयचे अधिन राहून विहित कालावधीमध्येच पुर्ण करणे आवश्यक राहील.

९. ३०% प्रथम Invoice ची रक्कम घेऊन प्रशिक्षण बंद केल्यास (Mid Term Close The Batch) किंवा दुसरे Invoice ची रक्कम ३०% घेऊन उमेदवारांना रोजगार/स्वयंरोजगार उपलब्ध करुन न दिल्यास (failure to provide employment or self employment by concern centre incharge ) घेतलेली संपूर्ण रक्कम १२% व्याजासह जिल्हा कौशल्य विकास कार्यकारी समितीस परत करण्यात येईल, उमेदवारांना दिलेले रोजगार/स्वयंरोजगारची वेळोवेळी पडताळणी (Timely verification done by the office about

AC DSDE & EE NGP

Scanned with CamScanner

authentication/realisticness / Guinness, of the provided placement uploaded by the concern centre incharge on the MSSDS Web portal ) ह्या कार्यालयाकडून करण्यात येईल, दिलेले Placement खोटे बनावटी (Fake And False, Manipulated) आढळल्यास गंभीर स्वरुपाचे कार्यवाही जिल्हा कौशल्य विकास कार्यकारी समिती, नागपूर द्वारे करण्यात येईल.

१०. संदर्भ क्र. १,२ व ३ चे शासन निर्णय तसेच महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी यांनी वेळोवेळी निर्गमित केलेले परिपत्रके, मार्गदर्शन सुचना नुसार आपणास टप्यानिहाय (Stage wise) ३० टक्के प्रशिक्षण शुल्काची रक्कम चालु आर्थिक वर्षामध्ये १५ मार्च, २०२१ पर्यंत सोसायटीकडून प्राप्त Invoice च्या अधिन राहून देय राहील, उर्वरित ७० टक्के रक्कम प्रशिक्षणार्थी उमेदवारांचे मुल्यमापण, अरोसमेंट उमेदवारांना देण्यात येणारा रोजगार/स्वयंरोजगार विचारात घेऊन पुढील आर्थिक वर्ष ( सन २०२१-२२) मध्ये देय राहील, जिल्हा नियोजन समितीकडून निधी प्राप्त झालेनंतर प्रशिक्षणाचे गुणवत्तेचे (Quality Skill Education) अधीन राहून आपणास Invoice ची रक्कम नियमाप्रमाणे TDS कपात करुन धनादेशाद्वारे अदा करण्यात येईल, निधी प्राप्त होण्यास विलंब झाल्यास किंवा इतर कोणत्याही तांत्रिक कारणास्तव निधी प्राप्त न झाल्यास त्यांची कोणत्याही प्रकारची जबाबदारी या कार्यालयाची राहणार नाही, त्याअनुषंगाने संबंधित केंद्रप्रमुखांना कोणत्याही प्राधीकरणाकडे उजरतक्रार करता येणार नाही, कार्यादेशातील अटी आणि शर्ती मान्य असल्याचे हमीपत्र/स्वयंघोषणापत्र रु. १००/- च्या स्टॅम्प पेपरवर करुन देणे संबंधित केंद्राना बंधनकारक राहील.

११. प्रशिक्षण शुल्काची रक्कम सन २०१९-२० चे तासिका तत्वावर निश्चित करण्यात आलेल्या दरानुसार अदा करण्यात येईल (As per the invoices received by the MSSDS)

१२. प्रशिक्षणादरम्यान प्रशिक्षण वर्ग कोणत्याही धार्मीक कारणास्तव (सन, उत्सव, त्यौहार) बंद ठेवावयाचे असल्यास त्याबाबत आधी पुर्व सुचना ई-मेल द्वारे या कार्यालयास देणे बंधनकारक राहील, आकस्मित तपासणीच्या दिवशी केंद्र बंद आढळल्यास त्यांची गंभीर दखल घेऊन संबंधित केंद्राविरुद्ध कार्यवाही करण्यात येईल.

१३. उमेदवारांना प्रशिक्षण देण्यासाठी निकषाप्रमाणे विहील अर्हतता व अनुभव धारक Trainer/Teacher/Instructor यांची नियुक्ती करणे आवश्यक राहील, काही कारणास्तव Trainer बदलवयाचे असल्यास त्याची माहिती ई-मेल द्वारे कार्यालयास देणे आवश्यक राहील, वेबपोर्टलवर नमुद करणाऱ्या वेळेतच उमेदवारांना प्रशिक्षण देणे आवश्यक राहील, वेळेमध्ये बदल करावयाचे असल्यास MSSDS पोर्टलवर बदल करुन त्यांची एक पत्र माहितीसाठी या कार्यालयास पुरविणे आवश्यक राहील.

१४. कोरोनाची परिस्थिती विचारात घेता उमेदवारांसाठी केंद्रामध्ये आरोग्यविषयक सर्व सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी देखील संबंधित केंद्रप्रमुखांची राहील, केंद्रामध्ये Oxygen आणि Temperature मोजमाप करणारी यंत्रे देखील उपलब्ध करुन ठेवणे आवश्यक आहे.

**(टिप :- कार्यादेश मुळ नस्ती/टिपणी मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जि.कौ. वि.कार्यकारी समिती, नागपूर यांचे द्वारे अनुमोदीत/मान्य)**

Received
25/2/21
BNSS

Pravin Jadhav

आपला
Anup
(प्र.गं.हरडे)
सहायक आयुक्त तथा सदस्य सचिव
जि.कौ.वि.कार्यकारी समिती,
जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता
मार्गदर्शन केंद्र, नागपूर

Scanned with CamScanner